| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) तृतीय श्रेणी | [1][वरिष्ठ सहाय्यक (लेखा)] | [1](एक) नेमणुक एक तर—<br>(अ) यासंबंधी विहित केली जाईल अशी लेखालिपिक परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले [2][आणि त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केलेल्या] कनिष्ठ सहाय्यकांमधून भांडार सहाय्यक अथवा भांडारपाल यांना पदोन्नती देऊन करण्यात येईल, अथवा<br>परंतु असे की, सदर परीक्षा उत्तीर्ण केलेली एकही व्यक्ती उपलब्ध नसेल तर ज्यांची तीन वर्षापेक्षा कमी नाही एवढी अखंड सेवा पूर्ण येली असेल अशा सदर परीक्षा पदोन्नतीच्या दिनांकापासून दोन वर्षामध्ये किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा भरती) (नववी) सुधारा) नियम, १९९० हे प्रसिद्ध झाल्यानंतरचा यापैकी नंतरचा असेल त्या कालावधीत उत्तीर्ण न झाल्यास खालच्या पदावर पदावनत करण्यात येईल या अटीच्या आधीन राहुन लेखा प्रवर्गात येण्याचा पर्याय ज्यांनी स्वीकारला आहे असे कनिष्ठ सहाय्यक, भांडारपाल, भांडार सहाय्यक, यामधून पदोन्नती देऊन करण्यात येईल.]<br>आणखी असे की, संबंधित आयुक्तास अपवादात्मक बाबतीत कारणे लेखी नमूद करून उपरोक्त कालावधी एक वर्षाने वाढवता येईल.<br>(दोन) जे उमेदवार—<br>(अ) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [3][२८] वर्षाहून अधिक नसेल, मात्र लेखाविषयक किमान ३ वर्षांचा प्रत्यक्ष |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ३० नोव्हेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १ सप्टेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३—चालू | | | अनुभव असेल अशा उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा [1][३१] वर्षा-पर्यंत शिथिल केली जाईल, आणि<br>(ब) मान्यताप्राप्त अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील याबाबतीत लेखाशास्त्र व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्या अथवा पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गातील पदवी धारण करणाऱ्या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षांहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यंत लेखाविषयक कामाचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>२. नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेल्या व्यक्तीला, त्या पदावर नेमणूक झाल्याची तारीख अथवा अशा प्रकारच्या विभागीय परीक्षेचे नियम विहित करणारी तारीख यांतील जी तारीख नंतरची असेल, त्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल :<br>परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी अपवादात्मक बाबतीत ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा कालावधी नमूद करून एक वर्षापर्यंत वाढवू शकेल.<br>३. पन्नास टक्क्यांहून अधिक नसतील इतकी पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येतील. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner